Shanti Education Society's
# A. G. Patil Polytechnic Institute, Solapur
NBA ACCREDITED PROGRAMS
(Approved by AICTE, New Delhi; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to MSBTE, Mumbai)
ISO 9001:2015 CERTIFIED DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18(2/2A)2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413008 (Maharashtra, India)
Ph.No.: 0217-2341899 E-mail: agppi.contact@gmail.com Web: www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/2024-25/173 Date: 12.02.2025

## हिवाळी-२०२४ परीक्षा

## साधारण पुनर्मूल्यांकनाबाबत (Re-assessment)....

संदर्भ : मरातंशिमं / क्र-४० / हि.प.२४ / गुणपडताळणी / फ्रेटोकॉपी / २०२५ / ४६, दि. २७.०१.२०२५.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याद्वारे घेण्यात आलेल्या हिवाळी-२०२४ परीक्षेकरीता फ्रेटोकॉपी मागविलेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना पुनर्मूल्यांकन (Re-assessment) करावयाचे आहे; अशा विद्यार्थ्यांनी मंडळाच्या संदर्भिय परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे व खाली नमुद आवश्यक कागदपत्रांसह शनिवार, दि. १५.०२.२०२५ ते रविवार, दि. १६.०२.२०२५ या कालावधीत महाविद्यालय कार्यालयात श्री. व्ही. ए. कदम (9767427273) संपर्क साधून ऑनलाईन अर्ज भरून घ्यावे. सदर मुदतीनंतर अर्ज भरता येणार नसल्याने होणाऱ्या शैक्षणिक नुकसानिस विद्यार्थी स्वतः जबाबदार असतील, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आवश्यक कागदपत्रे :

१. ज्या सत्रातील विषयांचे पुनर्मूल्यांकन (Re-assessment) करीता ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहे; त्या सत्राची मुळ गुणपत्रिका.

२. पुनर्मूल्यांकन (Re-assessment) करीता आवश्यक फी : Rs. 400/-

टिप :

१. फ्रेटोकॉपी व मुळ गुणपत्रिका विद्यार्थ्यांच्या संबंधीत विभागात गुरूवार, दि. १३.०२.२०२५ रोजी दु. १.०० नंतर उपलब्ध होतील.

२. रविवार, दि. १६.०२.२०२५ या दिवशी पुनर्मूल्यांकन (Re-assessment) करीता विद्यार्थ्यांनी श्री. व्ही. ए. कदम (9767427273) यांना संपर्क करावे.

डॉ. एम. ए. चौगुले
प्राचार्य
ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिटयट
सोलापूर.

A. G. PATIL POLYTECHNIC INSTITUTE ★ SOLAPUR ★

सोबत : संदर्भिय परिपत्रक

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००/१८८/११०

संकेतस्थळ : www.msbte.ac.in ई-मेल : secretary@msbte.ac.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. मरातंशिमं/का-४०/हि.प. २४/गुणपडताळणी/फोटोकॉपी /२०२५/४६ दिनांक: 27 JAN 2025

## हिवाळी परिक्षा — २०२४

### (अ) गुणपडताळणी / फोटोकॉपी बाबतचे वेळापत्रक

(कालावधी दि. २९.०१.२०२५ ते १४.०२.२०२५)

| अ.क्र. | कार्यवाही | कालावधी व दिनांक |
|---|---|---|
| १) | गुणपडताळणी/फोटोकॉपी करीता विद्यार्थ्यांनी Candidate Login द्वारे अर्ज सादर करण्याचा कालावधी | २९.०१.२०२५ ते ३१.०१.२०२५ |
| २) | संस्थांनी Institute Login द्वारे विद्यार्थ्यांनी गुणपताळणी/फोटोकॉपीच्या सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज अंतिमतः कन्फर्म करण्याचा कालावधी | २९.०१.२०२५ ते ०१.०२.२०२५ |
| ३) | विभागीय कार्यालयांनी RBTE Login द्वारे संस्थांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज विभागीय कार्यालयाद्वारे अंतिमतः कन्फर्म करण्याचा कालावधी. | २९.०१.२०२५ ते ०३.०२.२०२५ |
| ४) | विभागीय कार्यालयांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची माहिती मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | ०३.०२.२०२५ |
| ५) | विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या गुणपडताळणी / फोटोकॉपी अर्जानुसार संबंधित गुणमुल्यांकन केंद्र व विभागीय कार्यालयांना माहिती पाठविण्याचा दिनांक | ०४.०२.२०२५ |
| ६) | गुणमुल्यांकन केंद्राने मंडळाच्या निर्देशानुसार मूळ उत्तरपत्रिकांमधील गुणांची पडताळणी करण्याची कार्यवाही व मुळ उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती काढण्याचा कालावधी | ०४.०२.२०२५ ते ०६.०२.२०२५ |
| ७) | गुणमुल्यांकन केंद्राने कार्यवाही पूर्ण करुन संबंधीत पी सी डी सी (PCDC) कडे खालील प्रमाणे सिलबंद पाकीटे पाठविण्याचा कालावधी<br>(अ) गुणपताळणी/फोटोकॉपी यामध्ये गुणबदल (Change Case) झालेल्या प्रकरणांची मूळ उत्तरपत्रिका<br>(ब) फोटोकॉपी मधील गुणात बदल न झालेल्या (No Change Case) प्रकरणांची मूळ उत्तरपत्रिका<br>(क) फोटोकॉपीसाठी अर्ज केलेल्या सर्व उत्तरपत्रिकांच्या फोटोकॉपींच्या प्रती | ०६.०२.२०२५ ते ०९.०२.२०२५ |
| ८) | गुणबदल (Change Case) प्रकरणांची विभागीय कार्यालयाने त्रिसदस्यीय समिती गठीत करुन तपासण्याचा व मंडळाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याचा कालावधी | १०.०२.२०२५ ते ११.०२.२०२५ |
| ९) | पी सी डी सी ने प्राप्त फोटोकॉपी पाकीटे संस्था निहाय वर्गीकरण करुन संबंधित संस्था निहाय त्या विभागातील पी सी डी सी कडे पाठविण्याचा कालावधी | १०.०२.२०२५ ते १२.०२.२०२५ |
| १०) | गुणांमधील बदल झालेली प्रकरणे विभागीय कार्यालयाने मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | १२.०२.२०२५ |
| ११) | पी सी डीसी ने फोटोकॉपी उत्तरपत्रिका संबंधीत संस्थेला देण्याचा कालावधी | १२.०२.२०२५ ते १३.०२.२०२५ |
| १२) | संस्थेने आवश्यक नोंद करुन संबंधित विद्यार्थ्यास उत्तरपत्रिका फोटोकॉपी देण्याचा कालावधी | १३.०२.२०२५ ते १४.०२.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| १३) | गुणपडताळणी/फोटोकॉपी निकाल Institute Login व RBTE Login मध्ये जाहिर करण्याचा दिनांक | १४.०२.२०२५ |

**ब) पुनर्मूल्यांकन (Re-assessment) वेळापत्रक**

(कालावधी दि. १५.०२.२०२५ ते १२.०३.२०२५)

| अ.क्र. | कार्यवाही | साधारण पुनर्मूल्यांकनाचा कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| १४) | विद्यार्थ्याने फोटोकॉपीनिहाय विषयांच्या पुनर्मूल्यांकनाकरीता Candidate Login द्वारे अर्ज सादर करावयाचा कालावधी | १५.०२.२०२५ ते १६.०२.२०२५ |
| १५) | संस्थांनी Institute Login द्वारे विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज कन्फर्म करण्याचा कालावधी | १५.०२.२०२५ ते १७.०२.२०२५ |
| १६) | विभागीय कार्यालयाने RBTE Login द्वारे संस्थांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज अंतिमतः कन्फर्म करण्याचा कालावधी | १५.०२.२०२५ ते १८.०२.२०२५ |
| १७) | विभागीय कार्यालयांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची माहिती मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | १८.०२.२०२५ |
| १८) | विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या अर्जानुसार विद्यार्थी आसन क्रमांक व पेपर कोड नुसार माहिती वर्गीकृत करून संबंधित पी सी डी सी व पुनर्मूल्यांकन केंद्राकडे पाठविण्याचा दिनांक | २०.०२.२०२५ |
| १९) | पी सी डी सी ने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केलेल्या मूळ उत्तरपत्रिका संबंधित आर.आर. ए. सी. कडे पाठविण्याचा कालावधी | २०.०२.२०२५ ते २२.०२.२०२५ |
| २०) | आर आर ए सी ने करावयाच्या पुनर्मूल्यांकनाच्या कार्यवाहीचा कालावधी | २३.०२.२०२५ ते २८.०२.२०२५ |
| २१) | आर आर ओ सी मध्ये केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समितीने करावयाची छाननी व त्या अनुषंगाने निर्गमित करावयाच्या आदेशांचा कालावधी | २५.०२.२०२५ ते ०१.०३.२०२५ |
| २२) | विभागीय कार्यालयांनी मुख्य कार्यालयाकडे पुनर्मूल्यांकनाचा अहवाल ऑन लाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी | ०३.०३.२०२५ |
| २३) | पुनर्मूल्यांकनाचा निकाल Institute व RBTE Login मध्ये जाहीर करण्याचा दिनांक | ०४.०३.२०२५ |
| २४) | पुर्नमुल्यांकनामध्ये गुणबदल प्रकरणानुसार निकाल दुरुस्ती करण्याचा कालावधी | ०५.०३.२०२५ ते ०७.०३.२०२५ |
| २५) | निकालदुरुस्तीनंतर सुधारित गुणपत्रिका संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | ०८.०३.२०२५ |
| २६) | संस्थेने सुधारित गुणपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याचा कालावधी | १२.०३.२०२५ |

**विशेष सूचना -**

१. संस्थांनी उपरोक्त तक्त्यातील अ आणि ब वेळापत्रक सुचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

२. विद्यार्थ्यांनी वेळापत्रकात दिलेल्या कालावधीत अर्ज भरुन संस्थेमार्फत आवश्यक शुल्क भरुन अर्ज विहित कालावधीत Confirm करणे आवश्यक आहे.

३. संस्थांनी वेळापत्रकानुसार Confirm केलेले सर्व अर्ज आवश्यक शुल्क भरुन विभागीय कार्यालयात Confirm करणे आवश्यक आहे.

४. हिवाळी-२०२४ परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी / पुनर्गुणमुल्यांकनाकरीता अर्ज केला असला तरी उन्हाळी- २०२५ चा परीक्षा अर्ज विहीत कालावधीतच सादर करावा.

५. विद्यार्थ्यांनी प्राप्त फोटोकॉपी मधील गुणांमध्ये बदल असल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांमार्फत संबंधित विभागीय कार्यालयाकडूनच सदर प्रकरणाचा पाठपुरावा करून गुणबदल करणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्याने फोटोकॉपीमधील गुणांमध्ये फरक असल्यास अ. क्र. ५ नुसार कार्यावाही न करता रिअसेसमेंटसाठी अर्ज केल्यास फोटोकॉपीमधील गुणांत बदल ग्राह्य धरला जाणार नाही व रिअसेसमेंट मध्ये मिळालेले गुण अंतिम गुण म्हणून ग्राह्य धरले जातील, ही बाब संबंधित विद्यार्थ्यांना रिअसेसमेंट साठी अर्ज करण्यापूर्वी प्रकर्षाने जाणीव करून देण्यात यावी.

७. संस्थेने विद्यार्थ्यांचा पुनर्गुणमुर्त्यांकनाचा (Reassessment) अर्ज निश्चित करण्याआधी विद्यार्थ्यांची हिवाळी परीक्षा २०२४ ची मंडळाद्वारे देण्यात आलेली मूळ गुणपत्रिका संस्थेत जमा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पुनर्गुणमुर्त्यांकनाचा अर्ज निश्चित होणार नाही.

८. वरीलप्रमाणे जमा केलेल्या सर्व मूळ गुणपत्रिका एका बंद लिफाफ्यामध्ये संबंधित विभागीय कार्यालयाकडे जमा करून संबंधित पोचपावती घ्यावी. त्याशिवाय विभागीय कार्यालयाकडून पुनर्गुणमुर्त्यांकन अर्ज निश्चित केले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(उमेश टे. नागदेवे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत --

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१ यांना माहितीस्तव सादर.

२) उपसचिव, म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

३) सहा. सचिव (तां), का. क्र. ४० यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी